# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि १८/०१/२०२४

दुखापते :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पो स्टेगाडगे नगर अम श अप क्र ७३/२०२४ कलम १४३,१४, १४८,३०७,५०४,५०(ब) भादवी | आझाद नगर ग्राउंड अमरावती | १७.०१.२०२४ चे २१.१५ वा<br><br>दातावेळ १८.०१.२०२४ चे ००.४९ वा | अब्दुल सत्तार अब्दुल गप्फार वय ३७ वर्ष धंदा हमाली रा. आझाद नगर मरीयम मज्जीद बाजुला अमरावती | १. सददाम ,२.अल्लु मामु, ३. फीरोज लम्बा , . चिंटू , ५. विकास सर्व रा आझाद नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी व आरोपी हे एकाचे महोल्यात राहत असून घतावेळी व ठीकाणी फीर्यादी हा त्याचे नातेवाईक सोबत घराजवळ ग्राउंडवर बोलत उभा असतांना यातील नमुद आरोपी हे त्या ठीकाणी आले व फीर्यादी कडे पाहून आई बहीणीवर शिवीगाळ करीत होते. फीने घराजवळ शिवीगाळ का करता असे म्हटले असता नमुद आरोपी पैकी सददाम याने खीशातील व फीरोज याने त्याचे जवळील चाकुने फीचे डोक्यावर वार करण्याससुरुवात केले फीचे डोक्यावर तिन चार वेळा चाकून मारहाण केली. फीर्यादी जखमी होवून खाली पडला त्याचे हाताला सुध्दा चाकू लागला आहे. तसेच जिवेमारण्याची धमकी दिली आरोपी हे घटनास्थळावरुन शिवीगाळ करुन पळून गेले फीचे साळा व इतर लोकांनी उपचाराकरीता ईर्वीन दवाखाना येथे भरती केले. अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र ७४/२०२४ कलम १४३,१४७,१४८,१४९,३५३, ३३६ भादवी | आझद नगर मैदान अमरावती | दि १७.१.२०२४ रोजी रात्री २१.०० वा<br><br>दि १८.१.२०२ चे ०२.३२ वा | पोकॉ सुनील अंकुशराव बाजगीरे बनं १२३२ नेमनुक पोस्टे गाडगेनगर अमरावती | १ सददाम उर्फ इरफान खान २ सददाम उर्फ इरफान खान त्याची आई ३ विकास चढार ४ इमरान खान बिस्मील्ला खान ५ फीरोज लंबा ६ चिटु व ७ त्याचे इतर साथीदार रा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी दि १७.१.२०२४ रोजीचे २१.०० वा दि १८.१.२०२४ रोजीचे सकाळी ०८.०० वा पावेतो माझ्ी बीट मांशल ३/४ मध्ये पोकॉ प्रताप लोखंडे बनं १७३६ यांचे सोबत होती त्याप्रमाणे आम्ही दोघेही २१.००वा कंतव्यावर हजर होवुन एरीयात पेट्रोलींग करीत असता पोलीस नियंत्रन कक्ष येथुन २१.०० वा चे सुमारास माहीती प्राप्त झाली की आझादनगर परीसरात भांडण सुरू असुन अब्दुल सत्तार अब्दुल गफ्फार वय ३८ रा आझादनगर याचेवर चाकु हल्ला झाला असुन त्याठीकानी आपन त्वरीत पोहताच आझादनगर मैदानात पोहचलो तेथे हजर असलेल्या लोकांना विचारपुस केली असता समजले की सददाम उर्फइरफान खान बिस्मील्ला खान व त्याचे इतर साथीदारांनी अब्दुल सत्तार अब्दुल गफार वय ३८ रा आझादनगर अमरावती याचेवर चाकुने डोक्यात वार करून पळुन गेले आहे तसेच जख्मीला त्याचे नातेवाइक व मीत्रांनी इर्वीन दवाखाना येथे उपचाराकरीता घेवुन गेले आहे सदरची माहीती आम्ही आपनास फोनव्दारे दीली तसेच आपले आदेशानुसार सदर भागात आरोपी परत येण्याची शक्यता असल्याने त्याच भागात पेट्रोलींग करीत होते अं २३.०० वा चे सुमारास आम्ही आझादनगर येथे जख्मीचे घराजवळ थांबलो असता त्याठीकानी दहा बारा स्त्री व पुरूष असे मोठमोठयाने शीवीगाळ करीत आले मी व पोकॉ प्रताप लोखंडक असे त्वरीत सददाम उर्फ इरफान खान बीस्मील्ला खान व विकास चढार यांनी पकडण्यासाठी गेलो असता त्या लोकांनी आरोपी पळुन जावे म्हणुन आमचेवर व आम्हाला माहीती देत असलेल्या लोकावर दगडफेक करण्यास सुरूवात केली दगडफेक करणारे सर्व लोक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आझद नगर अमरावती | मोठमोठयाने आओ तुम्हारे को बताते है असे म्हणुन मोठमोठयाने शीवीगाळ करीत होते आम्ही त्याचा पाठलाग करीत असता इरफान खान बिस्मरल्ला खान हा नालीत पाय अडकुन तोंडावर पडला त्यावेळी सुध्दा त्याचे सोबतच्या लोकांनी दगडफेक केल्याने ते दोघेही गोंधळाचा फायदा घेवुन पळुन गेले तरी आज १७.१.२०२४ चे रात्री २३.०० वा चे सुमारास सददाम उर्फ इरफान खान व त्याचे आई, विकास चढार ,इमरान खान बिस्मील्ला खान , फीरोज लंबा चिंटु व त्याचे इतर साथीदार यांनी संगनमत करून गौरकायदयाची मंडळ ी जमवुन आम्ही शासकीय गणवेशात असतांना व गुन्हयातील आरोपी ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असता आमचे कायदेशीर र्कतव्यात अडथळा निर्माण करून दगडफेक केल्यानें त्याचे विरूध्द लेखी तक्रार देत आहे .वरून सदर चा गुन्हा दाखल. |
| | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ४६/२४ कलम. २९४,३२३ ,५०४,५० ६ भादवी | हॉटेल किचन ३६५ गणपती नगर जुना बायपास अमरावती | घटना ता. वेळी १४/०१/२० २४ चे १०/३० वा.ते दरम्यान<br><br>दाखल ता.वेळी - १८/०१/२० २४चे ०१/०२ वा. | महेश राजु खोडे वय २५ वर्य रा.साईनगर समर्थवाडी अमरावती | निखील विकास अळसपुरे रा लॉर्ड हॉटेल मागे | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांची डयुटी हॉटेल किचन ३६५ येथे सुरु असतांना आरोपी निखील विकास अळसपुरे हा त्याचे मित्रा सोबत दारु पिवुन आला असता त्यास फ्रॅक क्लब मध्ये बसु दिले नसल्याचे कारणावरुन त्याने फीर्यादी यांचे गालावर थापड मारली फीर्यादी व हॉटेल मालकाला अश्लिल शिवीगाळ करुन हॉटेल कसे चालविता हे मी पाहतो अशी धमकी दिल्याने फीर्यादी यांचे तोडी रिपोर्ट वरुन आरोपी विरुध्द वरील गुन्हा नोंद. |

चोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र.45/2024 कलम 380भादवि | अमरावती | दि.17/01/2024 चे 19.30 वा दा.ता.वेळ दि.18/01/2024 चे 00.30 वा | एक महिला | ज्ञानेश्वर सोनाजी सुरजुसे रा. जेल क्वार्टर जवळ अमरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील आरोपी हा फिर्यादीचा नातेवाईक असुन आरोपीला दारु चे व्यसन आहे तो दारु पिण्यासाठी चोऱ्या करतो नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी हा दारुन घरी आला व फिर्यादीला दारु पिण्यासाठी पैशाची मागणी केली फिर्यादीने देण्यास नकार दिला असता फिर्यादीला शिवीगाळ करुन थापडा बुक्यांनी मारहाण केली व घरातील सामान घेवुन गेला त्यावेळी फिर्यादी घरातील सामान उचलुन ठेवत असतांना फिर्यादी चे लक्षात आले की डब्यात ठेवलेले 22000/-रुपये नगदी दिसत नाही म्हणुन फिर्यादी ने आरोपी चा शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपी मिळुन आला नाही थोड्या वेळात आरोपी कोठुन तरि दारु पिवुन घरी आलात्याला पैशान बाबत विचारले असता त्याने सदर पैसे ` मिच घेतले असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ करुन पळुन गेला तरि फिर्यादीचा नातेवाईक आरोपी याने फिर्यादीचेघराचे बांधकामा करिता घरी आणलेले नगदि 22000/-रु. चोरुन नेले आहे अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती ,अप क्र.७५/२०२४,कलम - २७९,३३७ भादवी सहकलम १३४ एम व्ही ॲक्ट | गुप्ता सिमेंट समोर कठोरा नाका जवळ अमरावती | गु.घटना ता.१७.०१.२०२४ चे २१.०० वा. दाखल ता.१८.०१.२०२४ चे ०३.२९ वा. | पंकज हरीदास गायकवाड वय ३६वर्ष,रा जवाहर नगर माउली अपार्टमेंट अमरावती, | एम एच -२७-ए सी - ७१९१ स्वीप्अ डीजायर चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की नमद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी जात असता गुप्ता सिमेंट समोर अचानकपणे मागून स्वीप डीझयर गाडी एम एच -२७-सी एस- ७१९१ स्वीप्अ डीजायर चा चालक याने ठोस मारुन पळून गेला. अपघातामध्ये फीचे डोक्याला व डाव्या पायाला इजा झाली. एम एच -२७-सी एस- ७१९१ स्वीप्अ डीजायर च्या गाडी चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपण् गाडी चालवून फीला ठोस मारुन जखमी केले . अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र १५/२०२४ कलम २९४, ५०४, ५०६(ब ३८५, ४२७, ३४ भादवी | चांदनी चौक जे बी बिल्डर्स लँन्ड डेवलपर्सस अमरावती | घटना दि. १७/०१/२०२४ १८/०० ते २३/५५ दरम्याण दाखल दि. १८/०१/२०२४ चे ०३/०३ वा | सैय्यद जब्बार सैय्यद रसुल वय ५० वर्ष व्यवसाय बिल्डर्स लँन्ड डेवलपर्सस रा. एस टी काँलणी वलगांव रोड अमरावती | १)खिजर रा.पँराडाईज काँलणी अमरावती २) गोलु शेख मन्नाम रा. अलहिला काँलणी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी वलगांव रोड येथे ४ एक्कर मध्ये ले आउट टाकले होते व त्यामधिल सर्वø प्लाँट विकले फिर्यादी यांना ८ ते १० दिवसा पहीले (खिजर) आरोपी क्र १ पुर्ण नाव माहीत नाही त्याने त्याचे मो. क्र. वरुन फिर्यादीला फोन आला व म्हणाला की जे लेआउट टाकले आहे. त्या मध्ये दलाली पाहीजे तेव्हा फिर्यादी यांनी म्हटले माझे प्लाँट पुर्ण विकल्या गेले तुला कशाची दलाली देवु आरोपी याने फिर्यादीस म्हटले मेरा नाम किसको भी पुछ लेना खिजर कोन है फिर्यादीने फोन काटला फिर्यादी नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी फिर्यादी हे बसले असता तेथे आरोपी क्र. १ व २ आले आरोपी क् १ याने फिर्यादीस मुझे दलाली लगेगी मेरा फोनकाट दिया अशी अश्लील शिवीगाळ केली आरोपी क्र. १ व २ तेथुन निघुन गेले दुकान बंद करुन फिर्यादी हे घरी गेले फिर्यादीला रात्री १०/०० वा फोन आला की दोन अनोळकी ईसम तुमच्या दुकानाची तोडफोड करत आहे, तेव्हा फिर्यादी यांनी ११२डायल यांना काँल करुन माहीती दिली फिर्यादी आँफिस जवळ गेले असता तेथे पोलीस आली होती आँफिस का बोर्ड व दुकानाचे शटर वर मारल्याचे निशान दिसत होते फिर्यादी हे शटर उधढुन सीसीटिव्ही फुटेच चेक केले असता त्या मध्ये दोन्ही आरोपी हे दुकानाची तोडफोड करतांना दिसले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

मजुका

| अ.क्र. | पो.ठाणे / अप क्रं | घटनास्थळ | गुन्हा घडला ता. व. वेळ,माहिती मिळाल्याची ता. वेळ , दा. ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्रं. गुन्हेगारी पुर्व इतिहास | आरोपीचे नाव व पत्ता गुन्हेगारी पुर्व इतिहास बाबत | मीळालेला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. 46/2024 कलम 12 (अ) म.जुगार का. | फ्रेजरपुरा आलमगीर मस्जीद चौक अमरावती | दि.18/01/2024 चे 11.15 वा<br><br>दा.ता.वेळ दि.18/01/2024 चे 14.23 वा | सरतर्फे पोहेकॉ योगश श्रीवास वय 53 वर्ष, ब.नं.1015 वा पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | 1)साहील खान वल्द साहेब खान वय 21 वर्ष, रा. आलमगीर मस्जीद जवळ फ्रेजरपुरा अम.शहर, 2) अजीत नारायण देशमुख वय 34 वर्ष, रा. ग्राम नांदुरा बुजरुग ता.जि. अमरावती | वरली मटका जुगार आकडे लिहीलेल्या 2 कागदी चिठ्ठया एक निळ्या साहीचे बॉलपेन कि. 05/-रुपये व नगरदी 1020/-रुपये चा जुगार माल व साहित्य | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टे. स्टाप सह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करित असता गुप्त बादमीदार यांच्या माहीतीवरुन नमुद आरोपीतांनवर जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन वरली मटका जुगार आकडे लिहीलेल्या 2 कागदी चिठ्ठया एक निळ्या साहीचे बॉलपेन कि. 05/-रुपये व नगरदी 1020/-रुपये चा जुगार माल व साहित्य मिळुन आला तो माल जप्ति पंचनाम्या प्रमाणे जप्त करण्यात आला आहे यातील नमुद दोन्ही आरोपीतांचे कृत्य कलम 12(अ) म.जु.का.प्रमाणे होत असल्याने त्याचेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| १ | पो. स्टे कोतवाली अप क्र २१/२४ कलम १२(अ) | रांका प्लाझा अमरावती | गु.घ. ता. वेळ दि १८/०१/२४ चे०३.०५ वा<br>गु दा. ता. | पो हे कॉ मलीक अहेमद ब न 12 पो स्टे सिटी | 1) अर्शद खान नझीर खान वय 19 वर्ष, | नगदी 17820 /- रुपये व आठ वरली मटका | हकीकत अशा प्रकरे आहे की फिर्यादी पो हे कॉ मलीक अहेमद ब न 12 पो स्टे सिटी कोतवाली शहर विषय – आरोपी नामे 1) अलोक श्रीवास रा- अमरावती ( फरार ) 2) अर्शद खान नझीर खान वय 19 वर्ष, रा यास्मीन नगर अम 3) रोहीत संतोष लोकरे वय 25 वर्ष, रा यशोदा नगर क्र 2 अमरावती 4) राहुल अरुण लोणारे वय 28 वर्ष, रा बेलपुरा अमरावती 5) जयप्रकाश विजय शर्मा वय 38 वर्ष,रा शोभा नगर अमरावती 6) विलास भास्करराव बोरकर वय 42 वर्ष, रा गोपाल नगर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मजुका | | वेळ दि १८/०१/२४ चे ०३.३९ वा | कोतवाली शहर | रा यास्मीन नगर अम 2) रोहीत संतोष लोकरे वय 25 वर्ष, रा यशोदा नगर क्र 2 अमरावती 3) राहुल अरुन लोणारे वय 28 वर्ष, रा बेलपुरा अमरावती 4) जयप्रकाश विजय शर्मा वय 38 | आकडे लिहीलेल्या चिठ्या , आठ डाँट पेन किमत 80/- रुपय अशा एकुण 17900 /- रुपये | अमरावती 7) मोहसीन शाह युसुफ शाह वय 33 वर्ष, रा ताज नगर क्र 1 अमरावती 8) वचन कृष्णराव माहुरकर वय - 42 वर्ष रा- गायत्री नगर अमरावती , आज दि 18/01/2023 रोजी चे 09/00वा ते 21/00 वा पावेतो सोबत NPC1425,328 PC 1552 असे पो स्टे सिटी कोतवाली हद्दीत मा पोलीस निरीक्षक साहेब यांचे आदेशाने पेट्रोलीग करीत असताना 13.05 वाजता API महेन्द्र ईगळे PSI गजानन राजमल्लु HC 1166, 1132, NPC 1117, 1365, PC 1712,657, C.I.U. पथक याना गुप्त माहीती मिळाली की राकाँ मॉल चे मागे गल्लीत काही इसम एक ते दहा च्या आकड्यावर पैसेची बाजीलावुन हारजीत चा खेळ चालवात आहे. अशा माहीती वरुन आम्ही वरील पो.स्टॉफ जयस्तंभ चौक येथे दोन पंचाना बोलावुन पायदळ राकाँ.माँल चे गल्लीत लपत झपत गेलो असता. मोकळया जागेत लोकाची गर्दी दिसली. त्या गर्दी मध्ये तिन इसम खाली बसुन एक ते दहा पर्यंत आकडे लीहुन लोंकाकडुन पैसे घेऊन चिठ्या देताना दिसले .त्याचे वर पो.स्टॉफ च्या मदतीने रेड केली असता.वरली मटका आकडे लावणारे लोक गल्ली बोळातुन पळुन गेले. त्याच्या पाठलाग NPC 328,1425, यानी केला. पंरतु मिळुन आले नाही. तसेच आकडे लिहनारा अलोक श्रिवास हा सुध्दा लोकाचा गर्दी पळुन गेला त्यास आम्ही व पंचानी ओळखले तसेच वरली मटका लिहणारे पो.स्टॉफ च्या मदतीने जागीच पकडुन पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्यानी त्याचे नाव 1) अर्शद खान नझीर खान वय 19 वर्ष, रा यास्मीन नगर अम 2) रोहीत संतोष लोकरे वय 25 वर्ष, रा यशोदा नगर क्र 2 अमरावती 3) राहुल अरुन लोणारे वय 28 वर्ष, रा बेलपुरा अमरावती 4) जयप्रकाश विजय शर्मा वय 38 वर्ष,रा शोभा नगर अमरावती 5) विलास भास्करराव बोरकर वय 42 वर्ष, रा गोपाल नगर अमरावती 6) मोहसीन शाह युसुफ शाह वय 33 वर्ष, रा ताज नगर क्र 1 अमरावती 7) वचन कृष्णराव माहुरकरवय -42 वर्ष रा - गायत्री नगरअमरावती असे सागीतले त्या त्याब्यातुन जप्तीपंचनाप्रमाणे नगदी 17820 /- रुपये व आठ वरली मटका आकडे लिहीलेल्या चिठ्या , आठ डाँट पेन किमत 80/- रुपय अशा एकुण 17900 /- रुपये चा मिळुन आला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्ष,रा शोभा नगर अमराव ती 5) विलास भास्करराव बोरकर वय 42 वर्ष, रा गोपाल नगर अमराव ती 6) मोहसीन शाह युसुफ शाह वय 33 वर्ष, रा ताज नगर क्र 1 अमराव ती 7) वचन | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कृष्णराव माहुरकर वय -42 वर्ष रा - गायत्री नगरअमरावती | | |

प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे / अप क्रं | घटनास्थळ | गुन्हा घडला ता. व. वेळ,माहिती मिळाल्याची ता. वेळ , दा. ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्रं. गुन्हेगारी पुर्व इतिहास | आरोपीचे नाव व पत्ता गुन्हेगारी पुर्व इतिहास बाबत | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खोलापुरी गेट 16/2024 कलम 65 ई मदाका | अंबागेट अमरावती | गुन्हा दाखल ता.वेळ 18/1/2024चे 12/40 गुन्हा दा.ता.वेळ 18/1/2024 चे 15/37 वा. | फिर्यादी सर तर्फे नापोकॉ नईम बेग कय्युम बेग ब.नं.106 गुन्हेशाखा अमरावती | शेख रिजाय अब्दुल अनिस वय 30 वर्ष रा रहेमत नगर लालखडी रोड अमरावती | हकिकत अश्या प्रकारे आहे की यातील पो.स्टाफ पो.स्टे.हद्दित पेट्रोंलींग करीत असतांना गुप्त बातमीदाकडुन माहिती मिळाली की यातील आरोपी नामे शेख रिजाय अब्दुल अनिस वय 30 वर्ष रा रहेमत नगर लालखडी रोड अमरावती हा अंबागेट जवळ टँगोपंच 180 एम एल च्या देशी दारु च्या पावटया घेवुन जात अश्या खात्रीलायक बातमीवरुन 20नग कि.अदाजे 1400 /- रु चा माल विक्री करायला घेवुन जात असतांना मिळुन आला त्याला त्याच्या दारु विक्री बाबत परवाणा विचारले असता त्यानी तसा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले करीता त्याचे विरुध्ध पो.स्टे.अप क्र. 16/2024 अन्वये कार्यवाही करण्यात आली |